सातारा, सोमवार, २५ जुलै २०१६ । किंमत ₹ ४

सकाळ

# छेडछाडप्रकरणी कोरेगावात कारवाई

पळशी, ता. २४ : कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील मुलींच्या छेडछाडप्रकरणी कोरेगावातील एका युवकावर आज पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली. 'युवतींच्या छेडछाडीचा प्रश्न ऐरणीवर' या मथळ्याखाली 'सकाळ'मध्ये आज प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदित्य ऊर्फ पप्या विलास ओसवाल (वय २१, रा, गावंदर, कोरेगाव) याच्यावर आज प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. दरम्यान, कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील काही मुलींची महाविद्यालयाशी संबंध नसलेल्या काही मुलांनी छेडछाड केल्याचे दोन दिवसांपूर्वी स्पष्ट झाले होते. त्यावर संबंधित मुलींच्या तक्रारीवरून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी कोरेगाव पोलिस ठाण्यास पत्र दिले होते. तसेच यासंदर्भात काही ठोस निर्णय घेण्यासाठी कोरेगावातील राजकीय, सामाजिक क्षेत्राशी संबंधित प्रमुख नागरिकांची बैठक काल महाविद्यालयात झाली होती.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव